# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
दिनांक:- १०/०२/२०१७

## महाराष्ट्र सेवा संघ मुंबई या संस्थेमार्फत शहिद पोलीस शिपाई स्वरुप अमृतकर यांना मरणोत्तर पुरस्काराने गौरविले

१९७१ च्या भारत - पाक युध्दात जबर जखमी झाल्यानंतर मिळालेला पुनर्जन्म सैन्यातील सेवानिवृत्तीनंतर पर्यावरण रक्षणासाठी खर्च करणारे लेफ्टनंट कर्नल (निवृत्त) श्री. सुरेश पाटील, नौदलातील उल्लेखनीय सेवेबरोबरच गतिमंदांसाठी कार्यरत असणारे निवृत्त कमांडर श्री. श्रीरंग बिजूर आणि पर्शियन, ऊर्दू, संस्कृत अशा अनेक भाषांवर प्रभृत्त्व असणारे व पोलीस कारकिर्दीत गुप्तवार्ता विभागात सेवा बजावलेले निवृत्त अतिरिक्त पोलीस उपायुक्त श्री. शिरीष इमानदार हे यंदाच्या महाराष्ट्र सेवा संघ मुंबई पुरस्कृत 'प्रेरणा पुरस्कारांचे' मानकरी ठरले आहेत. शनिवारी दिनांक ४ फेब्रुवारी रोजी सायं. ०५.०० वाजता संस्थेच्या मुलुंड (पश्चिम) येथील सभागृहात झालेल्या समारंभात लार्सन अँड टुब्रोचे (L And T) ज्येष्ठ संचालक वाय. एम. देवस्थळी यांच्या हस्ते प्रेरणा पुरस्कारप्राप्त मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

सुरक्षा दलातील अप्रकाशीत व उल्लेखनीय सेवा आणि सेवापश्चात केलेले समाजकार्य यांचा गौरव करण्यासाठी महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड या संस्थेतर्फे 'सॅल्युट

इंडिया' उपक्रमाअंतर्गत गेल्या वर्षीपासून वैद्य पाटणकर पुनर्वसन संस्थेच्या सहयोगाने 'प्रेरणा पुरस्कार' सुरु करण्यात आले आहेत.

गडचिरोलीमध्ये छत्तीसगड सीमेवर माओवाद्यांशी झालेल्या चकमकीत शहिद झालेले तरुण पोलीस शिपाई स्वरुप अमृतकर व वांद्रे येथे मोटारसायकलस्वाराच्या हल्ल्यात प्राण गमावलेले विलास शिंदे यांचाही यावेळी मरणोत्तर पुरस्काराने मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

